आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ६.००)

बुधवार, दिनांक : १६ ऑक्टोबर, २०२४

आकाशवाणी नागपूर,
आभाराणी पटवर्धन आपल्याला प्रादेशिक बातम्या देत आहे.

1. सत्तेतील सव्वा दोन वर्षातील कामांचा संक्षिप्त आढावा असलेल्या महायुती सरकारच्या कामांचे 'रिपोर्ट कार्ड' आज संयुक्त पत्रकार परिषदेत प्रकाशित.

2. महायुती सरकारचे विकासाचे सर्व दावे खोटे आणि बनावटी असल्याचा कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा दावा.

3. भविष्यात कामगार क्षेत्रासाठी आंतरराष्ट्रीय मानकांवर सर्वे करणार - राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय नागपूरचे उपमहासंचालक श्रीनिवास उप्पला यांची राष्ट्रीय परिषदेत माहिती.

4. भारत विरुद्ध न्यूझीलॅंडच्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्याचा आजच्या दिवसाचा खेळ पावसामुळे रद्द.

---

महायुती रिपोर्ट कार्ड - मुंबई ग्रेटर

सव्वा दोन वर्षातील विकासकामे हाच आमचा चेहरा असून समाजाच्या सर्व घटकांसाठी महायुती सरकारने काम केले आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत या विकासकामांची पोचपोवती जनता दिल्याशिवाय राहणार नाही आणि महायुती सरकार पुन्हा एकदा भक्कम बहुमतानं निवडून येईल असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज व्यक्त केला. महायुती सरकारच्या कामांचे प्रगतीपुस्तक आज संयुक्त पत्रकार परिषदेत प्रकाशित करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय राज्य मंत्री रामदास आठवले, खासदार सुनिल तटकरे आदी उपस्थित होते.

आमचं काम हाच आमचा चेहरा आहे. महाविकास आघाडीने आता विरोधी पक्षनेत्याचा चेहरा ठरवावा, असा टोला एकनाथ शिंदेंनी लगावला. तर, सत्ता पक्षाला कुठलीही चिंता

नाही. मुख्यमंत्री स्वतःच इथे आमच्याबरोबर बसले आहेत. शरद पवारांनी तुमचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण ते सांगा? असं आव्हान देवेंद्र फडणवीस यांनी पवारांना दिलं. त्यासोबतच राज्य सरकारच्या दोन वर्षांचा कामांचा लेखाजोखा मुख्यमंत्री शिंदे यांनी मांडला. विरोधी आघाडी केवळ कामे बंद पाडण्याची भाषा करत असल्याचेही ते म्हणाले. या सर्व योजना बंद करणाऱ्यांना जनता साथ देणार नाही, असं एकनाथ शिंदे म्हणाले.

---------------------------------------

पटोले -पत्रक

कटकारस्थान आणि असंवैधानिक मार्गाने सत्तेत आलेल्या एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखालील सरकारने पत्रकार परिषदेत केलेले विकासाचे सर्व दावे खोटे आणि बनावटी आहेत. मागील दोन वर्षात महाराष्ट्र विकासाच्या बाबतीत इतर राज्यांच्या तुलनेत पिछाडीवर गेला आहे. काँग्रेस सरकारच्या काळात महाराष्ट्र सर्वच आघाड्यांवर नंबर एक होता पण फडणवीसांच्या काळात आणि शिंदे सरकारच्या काळात महाराष्ट्राची अधोगती झाली हे उघड सत्य आहे. आघाडीवर असलेल्या महाराष्ट्राची गुजरातच्या हस्तकांनी मागील दोन वर्षात मात्र पुरती वाट लावली आहे, असा हल्लाबोल प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.

भाजपा युती सरकारने केलेल्या दाव्यांबाबत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की राज्यात प्रस्तावित असलेले मोठे प्रकल्प गुजरातमध्ये नेले गेले. राज्यातील उद्योगधंदे दुसऱ्या राज्यात गेल्याने महाराष्ट्रात बेरोजगारांची फौज बनली आहे. मुंबईतील महत्वाच्या जमिनी उद्योगपतीच्या घशात घातल्या आणि कंत्राटदारांचे भले केले असे सांगून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रिपोर्टकार्ड वर बोलणे हास्यास्पद आहे, त्यांनी रेटकार्ड वर बोलले पाहिजे असा टोला नाना पटोले यांनी लगावला आहे.

---------------------------------------

आदित्य ठाकरे - मुंबई दक्षिण

लोकसभा निवडणुका झाल्यानंतर मंत्रिमंडळाच्या प्रत्येक बैठकीत या सरकारने आपण काहीतरी जनतेसाठी देत आहोत, असे दाखवण्याचा प्रयत्न केला, मात्र खरा फायदा अदानी समूहाला करून दिला, असा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी केला आहे. धारावीमध्ये ५४० एकर, कुर्ला येथे २१ एकर, मुलुंड, भांडूप आणि कांजुरमार्ग असा एकत्रित २५५ एकर, मढमध्ये १४० एकर, देवनारमध्ये १४० एकरचा भूखंड अदानी समूहाला मिळाला आहे, त्याचा शासन आदेश निघेपर्यंत निवडणुका जाहीर झाल्या

नाहीत, असं ते म्हणाले. मविआ सत्तेत आल्यावर अदानी समूहाला दिलेले भूखंड काढून घेऊ, असं त्यांनी सांगितलं.

---------------------------------------

निवडणूक - एयर / पीटीसी

राज्यातल्या विधानसभा निवडणुकीसाठीचा कार्यक्रम केंद्रीय निवडणूक आयोगाने काल जाहीर केला. त्यानुसार राज्यातल्या सर्व जिल्ह्यात निवडणूकपूर्व तयारीला सुरुवात झाली आहे.

वाशिम जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी काल वार्ताहर परिषदेत निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. यावेळी निवडणुकीच्या तयारीविषयी माहिती देण्यात आली. आचारसंहिता सुरू झाल्यामुळे सर्व राजकीय पक्षांनी जाहिरात फलक हटवावेत तसंच नियमांचं काटोकोर पालन करावं असे आदेश निवडणूक अधिकाऱ्यांनी दिले.

अकोला जिल्ह्यात मुक्त वातावरणात निवडणूक व्हावी यासाठी चोख बंदोबस्त ठेवण्याचे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी दिले आहेत. यासाठी जिल्ह्यात ठिकठिकाणी तपासणी पथकं, चेकपोस्ट ठेवण्यात येणार आहेत. मतदान केंद्रावर मतदारांसाठी आवश्यक सर्व सोयीसुविधा उपलब्ध करायलाही जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सांगितलं आहे.

गडचिरोली क्षेत्रात ३ लाख ६ हजार ४१७, तर अहेरी विधानसभा मतदारसंघात २ लाख ५० हजार ९८५ असे एकूण ८ लाख १९ हजार ५७० मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. लोकसभा निवडणुकीनंतर १८ हजार ९४५ मतदार वाढल्याचे जिल्हाधिकारी दैने यांनी सांगितले.

---------------------------------------

अनिल देशमुख - नागपूर पीटीसी

भाजपा प्रणित सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे राज्यातील जनता हैराण झाली आहे. शेतकऱ्यांचे पुर्णपणे कंबरडे मोडले आहे. महागाईमुळे सामान्य जनता त्रस्त झाली आहे. सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने व्याहाड ते मोवाड "लढा माझ्या शेतकऱ्याचा" यात्रा काढण्यात येणार असल्याची माहिती माजी गृहमंत्री अनिल देशमुख आणि सलील देशमुख यांनी नागपुरात पत्र परिषदेत दिली.

-------------------------------------

ओमर अब्दुल्ला- एयर

जम्मू-काश्मीरमध्ये नॅशनल कॉन्फरन्स पक्षाचे नेते ओमर अब्दुल्ला यांनी आज मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. श्रीनगरमधल्या शेर-ए-काश्मीर इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटरमध्ये झालेल्या या सोहळ्यात नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी ओमर अब्दुल्ला आणि त्यांच्या मंत्रिमंडळाला पद आणि गोपनियतेची शपथ दिली. काँग्रेस पक्षानं सरकारमध्ये सामील न होता बाहेरून पाठिंबा देण्याचा निर्णय घेतल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

-------------------------------------

'रणांगण विधानसभेचे' - डेस्क

श्रोते हो, विधानसभा मतदारसंघांचा आढावा घेणारा 'रणांगण विधानसभेचे' हा कार्यक्रम उद्या गुरुवार, १७ ऑक्टोबरपासून आकाशवाणीवर सुरू होत आहे. दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागांच्या **Youtube** वरुन हा कार्यक्रम प्रसारित केला जाईल.

-------------------------------------

राष्ट्रीय सांख्यिकी

आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेद्वारे आयोजित केली जाणारी कामगार सांख्यिकी शास्त्रज्ञांची आंतरराष्ट्रीय परिषद (ICLS) ही सदस्य राष्ट्रांना कामगार वर्गासंदर्भात काही शिफारशी सुचवित असून त्यालाच अनुसरून राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकारच्या वतीने पुढील काळात भारतात कामगार क्षेत्रासाठी या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये आधारित मानकांवर सर्वे करणार असल्याची माहिती राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, नागपूरचे उपमहासंचालक श्रीनिवास उप्पला यांनी दिली. कामगार सांख्यिकी शास्त्रज्ञांच्या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या (ICLS) एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभात भारतीय खाण ब्यूरो, इंदिरा भवन, सिव्हिल लाईन्स नागपूर येथे ते बोलत होते.

**19** व्या आयसीएलएसच्या सर्वेक्षणात केलेल्या शिफारशींवर पुढील तीन महिन्याच्या काळात राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय भारत सरकार तर्फे सर्वे होणार असून या परिषदेची संपूर्ण

मानके योग्यरीत्या सर्वे मध्ये समाविष्ट असलेल्या प्रश्नोत्तरात अवलंबली गेली पाहिजे यासाठी अधिकारी वर्गाने या प्रशिक्षणाला गांभीर्याने घ्यावे असे त्यांनी सांगितले.

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, घरगुती सर्वेक्षण प्रभाग आणि राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, मुख्यालय, दिल्ली ह्यांच्या अधिकारी वर्गासोबत महाराष्ट्र, गुजरात आणि छत्तीसगढ राज्यांतील जवळजवळ १०० क्षेत्रीय अधिकारी प्रशिक्षणात सहभागी होते. हे प्रशिक्षण शिबिर श्रीनिवास उप्पला उपमहासंचालक, राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय नागपुर यांच्या अध्यक्षतेखाली झाले.

---------------------------------------

दीक्षांत समारंभ- पीआरओ

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा ११२ वा दीक्षांत समारंभ शुक्रवार, दिनांक २२ नोव्हेंबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आला आहे. दीक्षांत समारंभामध्ये गुणवंत विद्यार्थ्यांना पदके आणि पारितोषिके देऊन पुरस्कृत केले जाणार आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी दिली आहे.

---------------------------------------

फिजिओथेरपी केंद्र - पीआरओ

नागपूर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागातर्फे दिव्यांग आणि ६० वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांसाठी फिजिओथेरपी केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहेत. केंद्रामध्ये दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांना सेवा नि:शुल्क असून, इतरांना अत्यंत माफक दरात सेवा उपलब्ध असणार आहे.

---------------------------------------

कसोटी क्रिकेट - एअर

भारत आणि न्यूझीलंडमध्ये सुरू झालेल्या कसोटी क्रिकेट मालिकेच्या पहिल्या सामन्यातला पहिल्या दिवसाचा खेळ पावसामुळे रद्द झाला आहे. सकाळी बेंगळुरूच्या चिन्नास्वामी मैदान परिसरात पाऊस असल्याने सामना सुरू व्हायला उशिर झाला होता. दुपारी चहाच्या विश्रांतीपर्यंत पाऊस कायम राहिल्याने आजच्या दिवसाचा खेळ रद्द झाल्याची घोषणा करण्यात आली.

------------------------------------------

हवामान - आरएमसी

विदर्भातील नागपूर, अमरावती , यवतमाळ, बुलढाणा या जिल्हयात आज तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

------------------------------------------